# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहाय्यक आयुक्त, 'सी' विभाग यांचे कार्यालय,**

**७६, श्रीकांत पालेकर मार्ग, चंदनवाडी, मरीनलाईन्स, मुंबई - ४००००२**

**<u>शुद्धिपत्र - १</u>**

**<u>स्वारस्य अभिव्यक्ती / निविदा</u>**

'सी' विभाग परिसरातील चाळी व इमारतीमधून घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे व त्यासंलग्न सामाईक घरगल्लांची साफसफाई करणे या योजनेअंतर्गत काम करण्यासाठी इच्छुक स्थानिक / सदर कामाचा अनुभव प्राप्त संस्थांकडून अर्ज मागवून त्यांची पात्रता यादी तयार करण्यात येत आहे. इच्छुक स्थानिक / हाऊसगल्ली साफसफाईच्या कामाचा अनुभव असणा-या संस्था उदाः- नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था/ नोंदणीकृत सहकारी सेवा संस्था/अशासकीय संस्था/ नोंदणीकृत बेरोजगार संस्था. इच्छुक संस्था स्थानिक नसल्यास इतर इच्छुक संस्थांना सामाईक घरगल्ली स्वच्छतेच्या कामाचा कमीत कमी १ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. (सदर कामात 'सी' विभागातला अनुभव असल्यास संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल. कामाच्या आवश्यकतेनुसार २४ संस्थांची आवश्यकता आहे. आवश्यकतेनुसार 'सी' विभागात समाधानकारक काम केलेल्या अथवा करीत असलेल्या संस्था पुरेशा प्राप्त होऊ न शकल्यास परि.-१ मधील सामाईक घरगल्ली स्वच्छतेच्या कामाचा १ वर्षाचा अनुभव प्राप्त संस्थांचा विचार करण्यात येईल. इच्छुक सस्थेने सदरबाबत सक्षम अधिका-याच्या सहीचे काम समाधानकारक पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र मोहरबंद लिफाफ्यामध्ये इतर कागदपत्रांसोबत सादर करणे अनिवार्य आहे.)

इच्छुक स्थानिक संस्थांना या योजनेची सर्व माहिती, निविदा अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी रु. ४,७१२/- (रु.३,९९३ + १८% जीएसटी) या किमतीचे सी विभाग (घ.क.व्य.) खात्यामधून चलन प्राप्त करून रोख स्वरूपात किंवा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डी.डी. बृहन्मुंबई महानगपालिका आयुक्त या नावाने नागरीक सुविधा केंद्रात भरणा करावा. त्याकरीता दि. १६.०९.२०२६ ते दि. १७.०९.२०२६ या दिवशी सकाळी ११.०० वाजता ते सायं. ०४.०० वाजेपर्यंत इच्छापत्राच्या नमुन्यासाठी चलन उपलब्ध करुन देण्यात येईल.

संस्थेने 'सी' विभाग कार्यालयात इच्छापत्रासह इतर कागदपत्रे असणारा मोहरबंद लिफाफ्या सोबत अर्ज जमा करण्याचा अंतिम दिनांक १७.०९.२०२६ (सायं. ०४.०० वाजेपर्यंत).

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) सी विभाग**